वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. ४ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# मोस्ट वॉन्टेड सुदर्शन घुले, सुधीर सांगळे पोलिसांच्या जाळ्यात

# तीन आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी



बीड , (दिव्य न्युज):- मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींना कोर्टाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सरपंच देशमुख यांची हत्या करून सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे हे आरोपी फरार झाले होते. तर आरोपींना संतोष देशमुख यांच्याविषयी माहिती देणारा सिद्धार्थ सोनवणे हादेखील फरार होता. या तीनही आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवारी रात्री उशिरा अटक केली. आरोपींना आज कोर्टात हजर केल्यानंतर दोन्ही बाजूच्या वकिलांचा युक्तिवाद झाला आणि त्यानंतर कोर्टाने तीनही आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सरकारी वकिलांनी आज बाजू मांडताना म्हटलं की, या आरोपींकडून दहशत माजवून खंडणी मागितली जात असल्याने या भागात नवीन उद्योग येत नाहीत. तसंच संघटितपणे आरोपींकडून गुन्हेगारी सुरू आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी आरोपींना पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी विनंती सरकारी वकिलांकडून करण्यात आली. ही विनंती मान्य करत कोर्टाने आरोपींना १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात यापूर्वी चार आरोपींना अटक करण्यात आली होती. आरोपी विष्णू चाटे, जयराम चाटे, प्रतीक घुले आणि महेश केदार यांचा समावेश होता. तर आरोपी सुदर्शन चंद्रभान घुले , कृष्णा शामराव आंधळे, सुधीर ज्ञानोबा सांगळे हे फरार होते. या आरोपींना पकडण्यासाठी प्रसिद्धीपत्रक जारी करत फरार घोषित करण्यात आलं होतं. त्यानंतर आता सुदर्शन घुले, सुधीर सांगळे यांना अटक करण्यात आली आहे. तर कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. दोन्ही आरोपींना पुण्यातून अटक करण्यात आली आहे.

## संतोष देशमुख यांचे लोकेशन देणाऱ्या सिद्धार्थ सोनवणेला कल्याणमधून ठोकल्या बेड्या

बीड , (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यासाठी त्यांचे लोकेशन देणारा मस्साजोग येथीलच सिद्धार्थ सोनवणे यांच्या देखील स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी काल कल्याण (मुंबई) येथून एका उसाच्या गाडीवर काम करत असताना मुसक्या आवळल्या आहेत. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा आता पूर्णपणे उलगडा होण्यास मदत होणार

▶▶ पान २ वर

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## 'सरेंडर कधी व्हायचं ते आरोपी ठरवतो, पुरावे नष्ट करायला वेळ दिला' ; संदीप क्षीरसागर

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सीआयडीने आज मुख्य दोन आरोपींना पुण्यातून अटक केली. ३१ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यातील सीआयडी कार्यालयात सरेंडर झाला. यावरुन आता आमदार संदीर क्षीरसागर यांनी वेगळाच संशय व्यक्त केला आहे. आरोपी स्वत: कधी सरेंडर व्हायचं हे ठरवतात याचा अर्थ आरोपींना पुरावा नष्ट करायला वेळ दिला जात असल्याचा संशय क्षीरसागर यांनी व्यक्त केला.



आज पत्रकार परिषदेमध्ये आमदार संदीप क्षीरसागर यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील संशयीत आरोपींबाबत संशय व्यक्त केला. तसेच यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी केली.

आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले, लोकांचे एवढे मोर्चे निघत असताना आरोपींना अटक करण्यासाठी २६ दिवस का लागले? या

▶▶ पान २ वर

## धनंजय मुंडेंना मंत्रिपद सोडण्यास मजबूर करावं-आ.प्रकाश सोळंके

धनंजय मुंडे यांनी पालकमंत्री असताना आपले सर्व अधिकार वाल्मीक कराड याला दिले होते. त्यामुळे कराड हा सत्तेचं घटनाबाह्य केंद्र झाला होता. त्याच्या माध्यमातून सर्व गुंडगिरी, खंडणी आणि जिल्ह्यातील सामाजिक वातावरण बिघडून गेलं. त्यामुळे मला स्वत:लाही वाटतं की, या हत्या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होण्यासाठी धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदापासून स्वत: दूर व्हावं आणि ते स्वत:हून दूर होणार नसतील तर आमच्या




पक्षनेतृत्वाने त्यांना मंत्रिपद सोडण्यास मजबूर करावं, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

राष्ट्रवादीतीलच आमदाराने मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची जाहीरपणे मागणी केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या. बीड हत्या प्रकरणाविषयी पुढे बोलताना प्रकाश सोळंके म्हणाले की, मी स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र

▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातील मुस्लिम पुढाऱ्यांना स्व.बाबा सिद्दीकींच्या हत्येचा विसर पडला का?



### नागपुर येथे झालेल्या अधिवेशनात कोणत्याही मुस्लिम आमदारांनी किंवा राष्ट्रवादीच्या एकही आमदारांनी याबाबत ब शब्द ही काढला नाही

### एमआयएमचे आ.मुफ्ती इस्माईलसह काँग्रेस आणि राष्ट्रवादी सह समाजवादी पार्टी व उबाठामधील मुस्लिम आमदारांनी या हत्याकांड विषयी का प्रश्न उपस्थित केला नाही

### बीड जिल्ह्यातील मुस्लिम पुढाऱ्यांना वाल्मिक कराड, धनंजय मुंडेसह इतरांची चिंता पण बाबा सिद्दीकी विषयी कोणही बोलायला तयार नाही

बीड, (दिव्य न्युज):- महाराष्ट्रातील एकेकाळी आपला दबदबा ठेवणारे राज्याचे माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांची दिवसाढवळ्या धडाधड गोळीबार करून हत्या करण्यात आली. पोलिसांनी या हत्या करणाऱ्यांना पकडले पण त्याच्या पाठीमागचा मास्टरमाईंड कोण कोणाच्या आशिर्वादाने ही घटना घडविण्यात आली. याबाबत अद्यापही संपूर्ण माहिती आलेली नाही. नुकतेच नवीन सरकारचे नागपुर येथे सहा दिवशीय अधिवेशन भरविण्यात आले होते. या संपूर्ण सहा दिवसात एकच प्रश्न सतत चर्चेला होता तो म्हणजे मस्साजोग येथील संतोष देशमुख यांच्या हत्येचा हा प्रश्न लावणे गरजेचे होते. परंतु त्याच सोबत मुंबईतील वांद्रा येथे अत्यंत दुर्दैवी आणि मोठी घडना घडली. यामध्ये राज्यात मंत्री म्हणुन राहिलेले आणि सलग पाच ते सहा वेळेस राज्याच्या विधानसभेत आमदार म्हणुन निवडून आलेले बाबा सिद्दीकी यांच्यावर दिवसाढवळ्या गोळीबार करण्यात आला. यामध्ये ते शहिद झाले. पोलिसांनी मारेकऱ्यांना पकडले, इथेच हे प्रकरण थांबत नाही, यामागे कोण मास्टरमाईंड आहे कोणाच्या

▶▶ पान २ वर

## बाबा सिद्दीकी विषयी आवाज न उठविण्याचे कारण काय?-शेख अब्दुल रशिद



मुस्लिम समाजाचे फौलादी नेतृत्व आणि जिगरबाज नेते असलेले स्व.बाबा सिद्दीकी हे काही महिन्यापुर्वीच बीडमध्ये येवून गेले. अनेकांशी त्यांनी गाठीभेटी घेतल्या. बीडमध्ये कार्यक्रमही झाला अनेकांनी त्यांचे हार, शाल देवून स्वागतही केले पण अशा या जिगरबार नेतृत्वावर दिवसाढवळ्या गुंडांनी धडधड गोळ्या घालून ठार केले. पण जिल्ह्यातील एकही मुस्लिम पुढाऱ्यांनी, कार्यक्त्यांनी याबाबत साधे पत्रकही काढले नाही. एवढ्या लवकर त्यांना बाबा सिद्दीकींचा विसर कसा काय पडतो. असा प्रश्न समाजसेवक शेख अब्दुल रशिद यांनी विचारला आहे. ▶▶ पान २ वर

### सत्ताधाऱ्यांसह विरोधकांकडून देवेंद्र फडणवीस, अजित पवारांची मागणी ; संतोष देशमुख प्रकरणामुळे समीकरणे बदलणार का?

# बीडचा पालकमंत्री कोण होणार? मुंडे बहिण की भाऊ, सीएम की डीसीएम?

बीड, (दिव्य न्युज):- मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणामुळे सत्ताधारी आणि विरोधी आमदार, खासदार आक्रमक झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्री व्हावे, अशी मागणी केली जात आहे. तर दुसऱ्या बाजूला जिल्ह्यात धनंजय मुंडे व पंकजा मुंडे हे दोघे बहीण-भाऊ मंत्री असले तरी त्यांच्या नावाला विरोध होत आहे. आता पालकमंत्री पदावरून तर्क-वितर्क लावले जात आहेत.


राज्यातील राजकीय घडामोडीनंतर भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना हे महायुतीत आले. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत युतीकडून भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली. परंतु त्यांचा बजरंग सोनवणे यांनी पराभव केला. त्यानंतर त्यानंतर त्यांना विधान परिषदेवर संधी दिली. लोकसभेत धनंजय मुंडे यांनी पंकजा यांचा प्रचार केला होता. विधानसभेत युतीकडून परळीतून धनंजय मुंडे यांना उमेदवारी दिली. त्यांनी विक्रमी मतांनी विजय मिळविला. त्यावेळी पंकजा यांनी धनंजय यांचा प्रचार केला, तर विधानसभेत पुन्हा एकदा युतीचे पाच आमदार जिल्ह्यात विजयी झाले होते. मंत्रिमंडळ विस्ताराच्या वेळी बीडला पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्या रूपाने दोन मंत्रिपदेही मिळाली. परंतु खाते वाटप होण्याआधीच मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा अपहरण करून खून झाला. यात राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षाचा सहभाग

▶▶ पान २ वर

## फडणवीस, पवारांनी पालकत्व घ्यावे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकत्व घ्यावे, असा मुद्दा हिवाळी अधिवेशनात आ. संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला होता. त्यानंतर खा. बजरंग सोनवणे यांच्यासह भाजपचे आ. सुरेश





धस यांनीही फडणवीस यांनी पालकमंत्री व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली होती. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबतही काम केलेले आहे. तेदेखील जिल्हा सरळ करतील, असे म्हणत त्यांनी पवारांनी पालकत्व घेतले तर हरकत नसल्याचे बोलून दाखविले. खा. सोनवणे यांनीही पवार यांच्या पालकत्याबद्दल भाष्य केले होते.

## शिंदे गटाच्या माजी खासदाराकडून धनंजय मुंडे, पंकजा मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी

बीड , (दिव्य न्युज):- बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख






यांच्या हत्येचे राज्यभरात पडसाद उमेटले आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या चौकशीसाठी नुकताच वाल्मिक कराड सीआयडीला शरण आला आहे. वाल्मिक कराड हा

▶▶ पान २ वर

# चीनमध्ये कोरोनासारख्या नव्या व्हायरसचा हाहाकार



## रूग्णालयात गर्दी, स्मशानभूमीत प्रेतांचा खच

मुंबई, (दिव्य न्युज):- चीनच्या वुहान शहरातून पसरलेल्या कोरोना व्हायरसने संपूर्ण जगभरात थैमान घातलं होतं. कोविडमुळे जगभरातील अनेक लोकांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, आता कोरोनासारख्या आणखी एका व्हायरसने तोंड वर काढलंय, कोरोनानंतर पाच वर्षांनी चीनमध्ये नवा व्हायरस पसरलाय. चीनमध्ये सध्या ह्यूमन मेटान्यूमो व्हायरस हा व्हायरस वेगाने पसरतोय. संपूर्ण देशातील हॉस्पिटलमध्ये रुग्णांची गर्दी पाहायला मिळत आहे. शिवाय स्मशानभूमीमध्ये मृतदेहांचा खच पडलाय.

चीनमधील या नव्या व्हायरसची सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे. मीडिया रिपोर्टनुसार, कचझत हा नवा व्हायरस चीनमध्ये वेगाने पसरतोय. देशातील रुग्णालयात स्मशानभूमीप्रमाणे मृतदेह दिसत आहेत, असा दावाही केला.जातोय. अनेक लोकांना या व्हायरसची लागण होताना दिसत आहे. चीनमधील रुग्णालयात होत असलेल्या गर्दीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत, त्यामुळे संपूर्ण जगभरातून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. कचझत, कोरोना आणि माइकोप्लाज्मा न्यूमोनिया यासारखे आजार देखील वेगाने पसरत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे चीनमधील यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या आहेत.

व्हायरसमुळे हाहा: कार पाहायला मिळतोय, कचड़झत झाल्यानंतर ताप येतो, शिवाय वाची लक्षणे कोरोना व्हायरस सारखीच आहेत. त्यामुळे चीनची आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. मात्र, अजूनपर्यंत ठोस उपाययोजना करण्यात चीनला यश आलेले नाही. आरोग्य विभागातील सर्व अधिकारी एनडीटिव्हीच्या रिपोर्टनुसार, चीनमधील परिस्थितीचे निरीक्षण करत आहेत. कोरोनानंतर अवघ्या पाच वर्षांनी चीनमध्ये कचझत ने लोकांचं टेन्शन वाढलंय, कचझत या व्हायरसने चीनमधील नागरिक चिंतेत आहेत. हॉस्पिटलमध्ये रुग्णांची संख्या वाढत असल्याने आरोग्य विभागाकडूनही चिंता व्यक्त करण्यात येत आहे. लोकांनी सातत्याने मास्क वापरावा, सातत्याने हात धुवावेत, असा सल्ला आरोग्य विभागाकडून देण्यात आलाय.

ह्यूमन मेटान्यूमो व्हायरस हा एक आरएनए व्हायरस आहे. याचा शोध सर्वात प्रथम २००१ मध्ये डच संशोधकांनी घेतला होता. श्वास घेण्यास त्रास होत असलेल्या बाल रुग्णांच्या सॅम्पलची चाचणी करत असताना या व्हायरसची माहिती समोर आली होती. दरम्यान, हा व्हायरस गेल्या ६ दशकांपासून अस्तित्वात असल्याचा दावा तत्कालीन संशोधकांनी केला होता. या व्हायरसची लागण झाल्यानंतर श्वास घेण्यास त्रास होतो. हा व्हायरस प्रामुख्याने खोकला आणि शिंक आल्यानंतर वेगाने पसरतो. या विषाणू लहान मुले आणि वृद्धांमध्ये वेगाने पसरतो. व्हायरसचा वाढता प्रादुर्भाव पाहता अधिकाऱ्यांनी पुन्हा मास्क घालण्याचा सल्ला दिला आहे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे आणि मास्क घालावे असे आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. तसेच आपले हात वारंवार स्वच्छ करत रहा, असंही आवाहन करण्यात आलय.

२०२० मध्ये चीनमध्ये कोरोना विषाणूचा स्फोट झाला होता. या या विषाणूने जगभ जगभर हाहाकार माजवला होता. या विषाणूमुळे लाखो लोकांचा मृत्यू झाला. कोरोना सध्या थंडावला आहे. मात्र चीनमधून पुन्हा एकदा भीतीदायक चित्र समोर येत आहे. नवीन विषाणूच्या हल्ल्यामुळे तेथील रुणालयांमध्ये रुग्णांची गर्दी होत आहे. या नवीन विषाणूचे नाव ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) आहे. शेवटी, हा विषाणू काय आहे आणि तो मानवांसाठी किती धोकादायक आहे? याबाबत दिल्लीतील मॅक्स हॉस्पिटलचे वरिष्ठ पल्मोनोलॉजिस्ट डॉ. शरद जोशी यांनी सांगितले की, ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) हा नवीन विषाणू नाही. पण त्याचा नवा व्हेरिएंट चीनमध्ये आला असल्याचा दावा केला जात आहे.

आरोग्य सेवांचे महासंचालक डॉ. अतुल गोयल म्हणाले की, मानवी मेटापन्यूमोव्हायरस इतर श्वसन विषाणूंप्रमाणेच आहे. ज्यामुळे सामान्य सर्दी होते आणि यामुळे तरुण आणि वृद्धांमध्ये फ्लूसारखी लक्षणे दिसू शकतात. ते म्हणाले, चीनमध्ये मानवी मेटाप्न्युमो व्हायरस (एचएमपीव्ही) च्या प्रादुर्भावाविषयीच्या बातम्या आहेत. आम्ही देशातील श्वसन उद्रेक डेटाचे विश्लेषण केले आहे आणि डिसेंबर २०२४ च्या डेटामध्ये कोणतीही लक्षणीय वाढ झालेली नाही आणि आमच्या कोणत्याही संस्थेकडून किती प्रकरणे नोंदवली गेली आहेत, सध्याच्या परिस्थितीबद्दल काळजी करण्याची गरज नाही.

## बीडमधील सरपंच उद्धव सुरवसे खून खटला; आरोपींची जन्मठेप खंडपीठातही कायम

छत्रपती संभाजीनगर , (दिव्य न्युज):-बीड जिल्ह्यातील नेकनूरजवळील कुंभारी येथील तत्कालीन सरपंच उद्धव लिंबाजी सुरवसे यांच्या खुनाच्या गुन्ह्यातील तीन आरोपी बप्पा अशोक विद्यागर, सुधाकर भगवान भालेराव व बाबू लिंबाजी काळे यांची जन्मठेपेची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्याऔरंगाबाद खंडपीठाचे न्या. आर. जी. अवचट व न्या. एन. पी. धोटे यांनी कायम ठेवली.

याच गुन्ह्यातील दोन आरोपी विनोद मधुकर घिगे व राजेंद्र मधुकर घिगे यांची मुक्तता करण्याचा आणि त्यांना ठोठावलेल्या दंडाची रक्कम त्यांना परत करण्याचा आदेशही खंडपीठाने दिला. उद्धव यांचे बंधू भाऊसाहेब सुरवसे यांनी १७ जणांविरुद्ध नेकनूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. तक्रारीनुसार तत्कालीन सरपंच उद्धव सुरवसे यांची २० मार्च २०१३ मध्ये निवडणूक व पूर्ववैमनस्यातून निर्घृण हत्या करण्यात आली होती. बीडच्या सत्र न्यायालयाने २०१७ मध्ये बप्पा विद्यागर, सुधाकर भालेराव, बाबू काळे, विनोद घिगे व राजेंद्र घिगे यांना खुनाच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

या शिक्षेविरुद्ध आरोपींनी खंडपीठात धाव घेतली. तर निर्दोष सोडलेल्या आरोपींच्या शिक्षेसाठी तक्रारदार भाऊसाहेब सुरवसे यांनी अपील दाखल केले होते. मात्र खंडपीठाने त्यात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. तक्रारदारातर्फे ड. गिरीश नाईक-थिगळे यांनी, आरोपींकडून ड. अभय ओस्तवाल, ड. सुनील काळदाते, ड. पी. एन. मुळे, ड. एस. पी. चाटे, ड. एम. बी. उबाळे व ड. एन. बी. जाधव यांनी, तर सरकारकडून सहायक सरकारी वकील संजय घायाळ यांनी काम पाहिले.

## पिक अपला भरधाव आयशरची धडक चालकाचा मृत्यू

आष्टी, (दिव्य न्युज):- तालुक्यातील कन्हेवाडी येथील शेतकरी पुणे येथे कांदा विक्रीसाठी घेऊन जात असताना पाठीमागून येणाऱ्या भरधाव आयशरने जोराची धकड दिल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (ता.३) पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास यवत (जि. पुणे) येथे घडली. या घटनेने कन्हेवाडी गावावर शोककळा पसरली. बाळासाहेब पोपट सांगळे (वय वर्षे ४०) असे मयत चालकाचे नाव आहे.

शुक्रवारी कन्हेवाडी येथुन पुणे येथे कांदा विक्रीसाठी पीक अप ने (चक २३ थ ३७६६) जात असताना यवत पोलिस ठाण्याच्या हद्दीत पिक अप चे टायर पंक्चर झाले होते. चालकाने पंक्चर काढून पीक अप मध्ये बसण्याच्या तयारीत असतानाच पाठीमागून आलेल्या भरधाव आयशर ने जोराची धडक दिली. यामध्ये चालक बाळू पोपट सांगळे यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी यवत पोलिस दाखल होत जखमी चालकाला रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु चालकाचा जागीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिती कन्हेवाडी व कन्हेवडगांव येथील तरुणांना समजताच अनेकांनी घटनास्थळी धाव घेतली.यवत ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करुन गावी कन्हेवाडी येथे दुपारु शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्च्यात्य दोन मुलं, पत्नी, आई, वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. यवत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान ४ वरून

### पेठ बीड पोलिसांच्या

असल्याने आम्ही ३१ डिसेंबर रोजी पेठ बीड पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलो होतो. तेंव्हा ही आमची तक्रार पोलिसांनी घेतली नाही असा आरोप पीडित कुटुंबाने केला. तसेच गुरुवारी दि. २ यातील आरोपींनी आम्हाला मारहाण व शिवीगाळ करुन जेसीबी लावून आमचे घर पाडले. आज सकाळी घरासमोर बदामच्या झाडाला माझी आई मयत केशरबाई पवार (लय ५० वर्ष) यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ही आत्महत्या नसून माझ्या आईचा घातपात झाला असल्याचा आरोप मयत महिलेच्या मुलांनी केला आहे. हा बळी पेठ बीड पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे कारणीभूत असून, त्यांनी नेमीच आरोपींना पाठबळ दिल्याचा गंभीर आरोप केला. मृतदेह पोस्टमार्टमसाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला परंतु नातेवाईकांनी गुन्हा दाखल झाल्याशिवाय पोस्टमार्टम करु न देण्याचा पावित्रा घेत सही करण्यास नकार दिला. यामुळे जिल्हा रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. यानंतर हा जमाव पेठ बीड पोलीस ठाण्यात दाखल झाला होता. येथेही त्यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले. गुन्हा दाखल करा नंतरच पोस्टमार्टम करा हा पवित्रा कायम ठेवला होता. यामुळे दुपारी १२:३० नंतर पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.

### क्रांती ज्योती सावित्रीबाई

पालक,विद्यार्थी उपस्थित होते..

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रिन्सिपल अमृता मॅडम यांनी महिलांना विचार ऐकण्यासाठी व मांडण्यासाठी व्यक्त होण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे..शाळेच्या महिला पालकांनी मनोगत मांडले त्यामध्ये ऑनेस्टी शाळेत नेहमीच सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे शाळेला सुट्टी न देता विद्यार्थ्यां समवेत भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हे उल्लेखनीय आहे व समाधान व्यक्त केले.. महिला पालक प्रतिनिधी म्हणुन शेख इरफाना शेख मकसूद यांना मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मानीत करण्यात आले.. अर्चना ताई कचरे यांनी महिलांना खंबीरपणे जगण्यासाठी अनमोल मार्गदर्शन केले व सर्वच महापुरुषांचे विचार आचरणात आणावे व सहभागी व्हावे असे सूचित केले.. शीतल मालानी यांनी महिलांना स्वावलंबी व्हाव्यात यासाठी मार्गदर्शन केले...कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया गरुड यांनी केले...सर्व पाहुण्यांचा कार्य परिचय शाळेचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल वाघ यांनी दिला. श्रुती कुलकर्णी यांनी आम्ही सावित्रीबाई च्या लेकी यावर संगीतमय कविता सादर केली...पाहुण्यांचे आभार प्रदर्शन सुशीला जोशी यांनी केले..कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक प्रमुख प्रभा हरकळ मॅडम, ठोसरे ताई, टाक ताई यांनी मेहेनत घेतली...

### हाजी मोहम्मद रफीक

शिक्षण तज्ञ पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली यामध्ये माजी आमदार सय्यद सलीम, मोईन मास्टर, सलीम जहागीर, जावेद भैय्या कुरेशी, एडवोकेट शेख शफिक आयुब खान पठाण आदी मान्यवरांच्या उपस्थिती होती.

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण

प्रशांतजी राठोड,विलास कदम,किशोर कदम,महेश कदम,जीवन नखाते ,बापूराव कदम या ग्रामस्थांना वृक्ष दत्तक भेट देण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले तर आभार डॉ. सुनील पाटील व उपप्राचार्य डॉ. होंन्ना गजानन होंन्ना यांनी शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमासाठी स्वयंसेवक विद्यार्थी- विद्यार्थिनी तसेच ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### निर्भीड पत्रकार संघाची

तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब आडागळे, उपाध्यक्षपदी शेख हमीद, सचिव राजरत्न डोंगरे, सहसचिव सिद्धेश्वर गायकवाड, तालुका कार्याध्यक्षपदी संतोष रासवे, तर मार्गदर्शक म्हणून प्रचंड सोळंके यांची निवड करण्यात आली. संघटक विजय कापसे, सहसंघटक विजय डावरे, प्रसिद्धीप्रमुख अनिकेत भिलेगावकर सह प्रसिद्ध प्रमुख दिगंबर गिरी, तर सदस्य पदी मुंजाभाऊ गाडेकर, गणेश तौर, लखन यादव, शेख लतीफ, दत्ता जाधव, प्रवीण आडागळे, तेजस शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी सर्व निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

पान १ वरून

### संतोष देशमुख यांचे

आहे.

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या केल्याच्या घटनेने जिल्ह्याला हादरवून सोडले होते. या हत्या प्रकरणातील फरार आरोपींपैकी प्रमुख सुदर्शन घुले व सुधीर सांगळे या दोघांनाही बीडच्या पोलिसांनी शुक्रवारी (दि.३) रात्री पुण्यातून ताब्यात घेतले आहे. तर या आरोपींना सरपंचाचे लोकेशन पुरविणारा मस्साजोग गावातीलच सिद्धार्थ सोनवणे याला देखील मुंबईतून बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. यापूर्वीच जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले यांना अटक केली आहे. तर तर पुरवणी जबाब आवरून विष्णू चाटे यांना देखील अटक करण्यात आलेली होती. सध्या या प्रकरणात कृष्णा आंधळे हा फरार आहे.

अंत्यविधीला होता उपस्थित

दरम्यान संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर सिद्धार्थ सोनवणे हा गावातच होता. मयत देशमुख यांच्या अंत्यविधीला देखील तो उपस्थित होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस सुरुवातीला आरोपींचा तपास करत असताना त्यांनी आपले लक्ष गावातच केंद्रित केलेले होते. अपहरण करण्यापूर्वी कोणीतरी जवळचा व्यक्ती लोकेशन देत असावा असा संशय पोलिसांना होता. लोकेशन देणाऱ्यांचा पोलीस शोध घेत असल्याची कुणकूण सिद्धार्थ सोनवणे याला लागली होती. घटनेच्या दोन दिवसानंतर तो देखील गावातून फरार झाला.

फरार झाल्यामुळे संशय वाढला

सिद्धार्थ सोनवणे फरार झाल्यानंतर त्याच्या संदर्भातील गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिळवण्यास सुरुवात केली. त्यानंतर सिद्धार्थ हा देखील या गुन्ह्यात सहभागी असल्याची खात्री स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना पटली. त्यानंतर १५ दिवसांपासून त्याचा शोध सुरू होता.

अखेर लोकेशन ट्रेस

सिद्धार्थ सोनवणे हा फरार झाल्यानंतर मुंबईत लपून बसला होता. त्याने या काळात वेगवेगळी पाच सिम कार्ड देखील वापरली होती. स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना त्याचे मुंबईतील लोकेशन मिळताच त्या ठिकाणी त्यांनी सापळा लावला. एका मोकळ्या पटांगणात उसाच्या गाड्यावर काम करत असतानाच पोलिसांनी त्याच्यावर झडप मारली.

या टिमची कामगिरी

ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय महेश विघ्ने, तुळशीराम जगताप, विकास वाघमारे, भागवत शेलार, गणेश मराडे, विक्की सुरवसे यांनी केली.

### 'सरेंडर कधी व्हायचं ते आरोपी

३०२ अजूनही का नाही. कुठेतरी धनंजय मुंडे मंत्री असल्यामुळे सरंक्षण मिळत आहे, असा संशय आमदार क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

हत्या घडल्यानंतर २६ दिवसांनी आरोपी एखाद्या पिक्चर स्टाईलसारखं सीआयडी कार्यालयात येतात. आरोपींनी हत्या तशीच गाडीचा पाठलाग करून हत्या केली. आरोपी सगळ्या घडामोडी पाहतो, सगळ्यांना कधी जमा व्हायचं ते सांगतो. मग धनंजय मुंडे यांची वरिष्ठांची भेट झाल्यानंतर तो एका गाडीमधून येतो. बाकीचे आरोपीही त्यांच्या वेळेप्रमाणे येतात. मला तर वाटत या लोकांना पुरावे नष्ट करण्यासाठी वेळ दिला जात आहे, असा संशय आमदार संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

या प्रकरणी माझी पहिल्या दिवसापासून सीडीआर तपासण्याची मागणी आहे. ज्यावेळी मोर्चा निघाला त्यावेळी त्यांनी एका हॉस्पीटलमधून डिस्चार्ज घेतला, त्याकाळात त्यांना कोण भेटायला आले होते याचे सीसीटीव्ही फुटेज तपासले पाहिजे. धनंजय मुंडे ज्यावेळी पालकमंत्री होते, त्यावेळी त्यांनी काही अधिकारी होते. या तपासात काही मागेपुढे होतंय. त्यामुळे त्यांनी हा तपास होत नाही तोपर्यंत त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला पाहिजे, अशा मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी केली.

### धनंजय मुंडेंना मंत्रिपद सोडण्यास

आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्यावी. या प्रकरणात निष्पक्ष चौकशी करू, असं मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे. आमचा त्यांच्यावर विश्वास आहे. बीड जिल्ह्यात कशा पद्धतीने अवैध धंदे सुरू आहेत, त्याचा वापर राजकारणात कसा केला गेला, याची संपूर्ण चौकशी होईल, अशी माहिती आमदार सोळंके यांनी दिली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्र जाईपर्यंत धनंजय मुंडे यांनी बिनखात्याचे मंत्री राहावे. अजित पवार यांनी त्यांना बाजूला करावे. तसेच अजित पवारांनी पालकमंत्री व्हावे, ते जिल्हा सरळ करतील, असा विश्वास भाजपचे आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला, तसेच आता 'आका'चे पाय खोलवर गेले असून, तो सुटण्याची शक्यता कमी आहे, असे सांगत वाल्मीक कराडबद्दलही नाव न घेता भाष्य केले. माजी पालकमंत्री व कृषिमंत्री यांनी काही अधिकार 'आका'कडे दिले होते. त्यामुळे त्यांच्या शिफारशीवरूनच जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या पोस्टिंग होतात. माजी पालकमंत्र्यांच्या कुटुंबातील लोकच दीडशे गुंड घेऊन जातात आणि पिचिंग तोडून राख नेतात. पर्यावरण विभाग आणि प्रदूषण महामंडळाने याची तपासणी करावी, असंही आमदार धस म्हणाले.

### महाराष्ट्रासह बीड

आशिर्वादाने ही घटना घडली याबाबत एकही प्रश्न त्या नागपुरच्या अधिवशेनामध्ये विचारण्यात आलेला नाही. एमआयएमचे आमदार मुफ्ती इस्माईल, समाजवादी पार्टीचे आ.अबु आझमी त्यांचे जोडीदारासह काँग्रेसमधील आमदार, राष्ट्रवादीचे आमदार आणि उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेतून निवडून आलेले आमदार... या एकही मुस्लिम आमदारांनी ब शब्दही या बाबत विचारला नाही. एवढ्या लवकर बाबा सिद्दीकी यांचा विसर या आमदारांना पडला का? पोलिसांनी मारेकरी पकडले. इथेच हे प्रकरण थांबत नाही या पाठीमागे मास्टरमाईंड कोण आहे हे शोधणे अत्यंत आवश्यक होते. पण दुःखाची बाब म्हणजे बाबा सिद्दीकी हे ज्या पक्षाचे होते त्या पक्षातील दिग्गज असलेले अजित पवार,छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे सह इतर आमदारांनीही एकही प्रश्न विचारला नाही. मस्साजोगच्या सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या विषयी देशाच्या लोकसभेत आवाज उठविण्यात आला. राज्यात महासंग्राम झाले पण राष्ट्रवादीसह काँग्रेसच्या एकही खासदारांनी लोकसभेतही हा प्रश्न विचारला नाही. या मुळे मुस्लिम समाजात मुस्लिम आमदार व खासदारांसह राष्ट्रवादीच्या सर्वच आमदारांविषयी कमालिची नाराजगी दिसून येत आहे. बीड जिल्ह्यातील मुस्लिम पुढाऱ्यांना बाबा सिद्दीकींचा विसर पडला. एवढी मोठी घटना घडूनही कोणीही एक साधे पत्रक काढले नाही की, नागपुरच्या अधिवेशनामध्ये एकही आमदारांनी या बाबत कोणतेच प्रश्न का विचारले नाही. पण या मुस्लिम पुढाऱ्यांना बाबा सिद्दीकी पेक्षा धनंजय मुंडेंवर होत असलेला अन्याय, वाल्मिक कराडवर होत असलेला अन्याय दिसुन आला आणि एका पाठोपाठ एक स्पर्धा लागल्यासारखे पत्रक काढून आम्ही किती तुमचे भक्त आहोत हे दाखवून देण्याची स्पर्धाच लावली होती. या सर्वांविषयी संपूर्ण राज्यभरातील मुस्लिम समाजात संताप व्यक्त केला जात असून समाजाचे नेतृत्व करणाऱ्या एक जिगरबार नेत्याची दिवसाढवळ्या हत्या होते आणि मुस्लिम समाज तोंड बंद करून गप्प बसतो याच्या पेक्षा मुस्लिम समाजाचे दुर्दैव काय असेल....

### बाबा सिद्दीकी विषयी

कोणाला धनंजय मुंडेंची फिकर तर कोणाला वाल्मिक कराडांची चिंता यांच्या खऱ्या खोट्यासाठी मुस्लिम पुढारी आणि छाटछूट कार्यकर्ते पत्रके काढण्याची स्पर्धा करत आहेत. पण त्यांना बाबा सिद्दीकींविषयी राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे राज्याच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे एखादे पत्रक काढून प्रश्न विचारता आला नाही की, बाबा सिद्दीकी यांच्या हत्या मागचा मास्टरमाईंड कोण आहे.झालेल्या अधिवेशनात एकाही मुस्लिम आमदारांनी याबाबत एकही प्रश्न विचारला नाही तसेच लोकसभेच्या झालेल्या अधिवेशनातही एकही खासदारांनी या विषयी विषय लावून धरला नाही या बाबत सर्वच आमदार आणि खासदारांचा जाहिर निषेधही शेख अब्दुल रशिद यांनी केला असून त्यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्याकडे मागणी केली आहे की बाबा सिद्दीकी यांच्या हत्येमागचा मास्टरमाईंड कोण आहे याचा शोध लावून त्याचा फासावर लटकविण्यात यावे अशी मागणी त्यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

### बीडचा पालकमंत्री

आढळला. तसेच याच प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड आरोपी झाले. त्यांच्या अटकेवरून मंत्री धनंजय मुंडे यांना विरोधकांसह सत्ताधाऱ्यांनी कोंडीत पकडत राजीनाम्याची मागणीही केली. त्यामुळे आता पालकमंत्री पदावरूनही तर्कवितर्क लावले जात आहेत.

प्रकाश सोळंकेंकडूनही राजीनाम्याची मागणी

धनंजय मुंडे यांच्या पक्षातीलच माजलगावचे आ. प्रकाश सोळंके यांनी २८ डिसेंबर रोजी बीडमध्ये निघालेल्या मोर्चातून मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा मागितला. त्याआधी आ. संदीप क्षीरसागर, खा. बजरंग सोनवणे यांच्यासह इतरांनी राजीनाम्याची मागणी केली होती.

धनंजय मुंडेंच्या बाजूने कोणीच बोलेना

धनंजय मुंडे यांना सत्ताधारी चारही आमदारांनी कोंडीत पकडले आहे. अधिवेशनात निकटवर्तीय असलेल्या वाल्मीक कराड यांच्याविरोधात आवाज उठविला. तसेच त्यांच्या राजीनाम्यासह इतरही आरोप केले जात आहेत.

सध्या तरी त्यांच्या बाजूने जिल्ह्यातील विधानसभेचा एकही आमदार नसल्याचे दिसत आहे. मुंडे यांच्यावर एवढे आरोप होत असताना कोणीही पुढे येऊन त्याबाबत जाहीरपणे प्रतिक्रिया दिलेली नाही, हेदेखील वास्तव आहे.

### शिंदे गटाच्या माजी

राष्ट्रवादीचे (अजित पवार) मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. महायुतीतील नेत्यांसह विरोधी पक्षातील नेतेही धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्याव अशी मागणी करत आहेत. अशात शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) माजी खासदार गजानन किर्तीकर यांनीही आता या प्रकरणी धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येबाबत बोलताना गजानन किर्तीकर म्हणाले, धनंजय मुंडे यांनी असा गुंड पोसला कशाला. याचबरोबर पंकजा मुंडे यांची कार्यपद्धती शोभणारी नाही. त्या भागातील जनतेचा या दोन्ही बहीण-भावावरील विश्वास उडालेला आहे. नैतिकता म्हणून धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांनी त्यागपत्र द्यावे, तरच त्यांना पुढील राजकीय वाटचाल करताना अडचण येणार नाही. टीव्ही ९ मराठीशी बोलताना गजानन किर्तीकर यांनी ही मागणी केली आहे.

गजानन किर्तीकर हे शिवसेनेकडून चार वेळा आणि वायव्य (उत्तर-पश्चिम) मुंबई लोकसभा मतदारसंघातून सलग दोन वेळा खासदार म्हणून विजयी झाले आहेत. शिवसेना फुटल्यानंतर त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. तर त्यांचे पुत्र अमोल किर्तीकर हे उद्धव ठाकरे यांच्यासोबत कायम राहिले होते. अमोल किर्तीकर यांनी शिवसेनेकडून (उद्धव ठाकरे) यंदाची लोकसभा निवडणुकही लढवली होती. मात्र, त्यामध्ये ते पराभूत झाले होते.